# प्रथम खबर अहवाल व त्याचे प्रकार

## गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक

# (१) प्रथम खबर अहवाल

## First Information Report (Cr.P.C. Sec. 154)

- **Cr.P.C. Sec.154** – दखलपात्र प्रकरणातील वर्दी
- **Cr.P.C. Sec.156** – पोलीसांना दखलपात्र गुन्ह्याचा तपास करण्याचे वैधानिक अधिकार आहेत व दंडाधिकाऱ्यांना १५६(३) प्रमाणे दखलपात्र गुन्हा दाखल करुन तपास करण्याचे आदेश देण्याचा अधिकार आहे.
- कायद्याने पोलीसांना दखलपात्र गुन्ह्याच्या तपासाचे अमर्याद अधिकार दिलेले असून हे अधिकार वैधानिक स्वरूपाचे (Statutory Powers) आहेत. सी.आर.पी.सी. कलम १५(१) प्रमाणे हे अधिकार पोलीसांना प्राप्त झाले असून त्या अधिकारात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्या व्यतिरिक्त कोणासही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. परंतु उच्च व उच्चतम न्यायालयास सी.आर.पी.सी. कलम ४८२ व भारतीय राज्यघटना आर्टिकल २२६ प्रमाणे रिट ऑफ मेंडामंस याचीकेद्वारे मर्यादित स्वरूपात पोलीस तपासात हस्तक्षेप करता येतो.

- एवढे अमर्याद अधिकार पोलीसांना तपासकामी असून सुद्धा पोलीस त्या अधिकाराचा पुरेपूर व योग्य वापर करीत नसल्याचे दिसून येते. पोलीसांनी त्यांना असलेले हक्क व जबाबदारी ओळखून तपास केला तर आरोपी निर्दोष सुटण्यास वाव मिळणार नाही व गुन्हे शाबितीचे प्रमाणात निश्चितच वाढ होईल. म्हणून पुढील मुद्यांची सविस्तर माहिती घेणे गरजेचे आहे. फक्त गुन्हा उघडकीस आणला यातच समाधान न मानता प्रत्येक आरोपीला शिक्षा व्हावी या उद्देशाने मनापासून गुन्ह्याचा तपास करावा. म्हणजे गुन्हे शाबितीचे प्रमाण वाढेल. हे प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याने / अंमलदाराने ठरविले, तरच हे शक्य आहे.

- प्रथम खबर घेताना कोणत्या गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे याची माहिती पोलीस ठाणे अंमलदार म्हणून काम करणाऱ्या पोलीस उप निरीक्षक, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक व पोलीस हवालदार यांना असणे गरजेचे आहे. प्रथम खबर नोंदवून घेणे हे पोलीस अधिकारी या नात्याने त्याचे प्राथमिक कर्तव्य असून सुद्धा पोलीस अधिकारी प्रथम खबर नोंदवून घेण्यास टाळाटाळ करतात. कधी कधी त्याचे स्वरूप कमी करणे अथवा वाढविणे किंवा गुन्हा दाखलच न करणे (Burking of offence) किंवा खबर देणाऱ्यास अर्ज लिहून आणण्यास सांगतात. इत्यादी आक्षेपार्ह घटना असून यावरून पोलीस अधिकाऱ्याचा सुरवातीपासून नकारात्मक दृष्टीकोन दिसून येतो. म्हणून हा दृष्टीकोन प्रथम बदलणे गरजेचे आहे.

- अशा प्रकारे वर्तन करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध कठोर पावले उचलणे गरजेचे आहे काही पोलीस अधिकारी दखलपात्र गुन्ह्याची प्रथम खबर दाखल न करता अर्ज चौकशी सुरु करतात. ही अत्यंत चुकीची बाब आहे. पोलीस अधिकाऱ्यांना दखलपात्र गुन्ह्याच्या अर्जाची चौकशी करण्याचा अधिकार कायद्याने दिलेला नाही, असे असताना सुद्धा चौकशी करणे बेकायदेशीर आहे. कायद्याने पोलीसांना तपासाचे व मॅजिस्ट्रेट किंवा न्यायाधिशांना व त्यांनी अधिकार प्रदान केलेल्या इसमांना चौकशी करण्याचे अधिकार आहेत.

## प्रथम खबर :- ( फौ.द.प्र.सं. कलम १५४ )

०१. दखलपात्र अपराध घडल्याबाबतची जी खबर पोलीस ठाणेस स्वाधीन असणाऱ्या अंमलदाराला तोंडी देण्यात येईल, ती खबर त्याने प्रत्येक प्रसंगी लिहून घेतली पाहिजे किंवा कोणाला हुकूम करुन स्वत:च्या देखरेखीखाली त्याच्याकडून लिहून घेतली पाहिजे. नंतर सदरहू खबर देणाऱ्यास वाचून दाखविली पाहिजे. अशा प्रत्येक खबरीवर मग ती लेखी असो किंवा लिहून घेण्यात आलेली असो, ज्या मनुष्याने ती दिली असेल, त्याने त्यावर सही केली पाहिजे आणि त्या खबरीचा सारांश राज्य सरकार ठरविल त्या नमुन्या प्रमाणे त्या अंमलदाराने ठेवावयाच्या बुकात दाखल केला पाहिजे.

०२. पोटकलम (१) अन्वये जी खबर दाखल करण्यात येईल त्याची एक नक्कल त्वरित खबर देणाऱ्या इसमाला विनामूल्य दिली पाहिजे.

०३. पोलीस ठाणे स्वाधीन असणाऱ्या अंमलदाराने पोटकलम (१) अन्वये त्याला देण्यात आलेली खबर दाखल करुन घेण्यास नकार दिला असेल, तर त्यामुळे ज्या मनुष्यावर अन्याय झाला आहे, अशा मनुष्यास, सदरहू खबरेचा लेखी सारांश संबंधित पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधिक्षक यांचेकडे पोष्टाने पाठविता येईल, आणि जर त्या अधिक्षकाला अशी खातरजमा होईल की, सदर खबरीनुसार कॉग्निझेबल/ दखलपात्र अपराध घडला आहे असे स्पष्ट होत आहे, तर त्याने या अधिनियमान्वये तरतुद केल्याप्रमाणे सदरहू अपराधाच्या तपासाचे काम स्वत: हाती घेतले पाहिजे किंवा आपल्या हाताखालील कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडे ते काम सोपविण्याचा हुकूम केला पाहिजे आणि अशा प्रकारे ज्या पोलीस अधिकाऱ्याकडे काम सोपविण्यात आले असेल, त्या पोलीस अधिकाऱ्याला सदरहू अपराधाच्या बाबतीत पोलीस ठाणे स्वाधीन असणाऱ्या अंमलदारास जे अधिकार आहेत, ते सर्व अधिकार असतील.

## -: पहिली खबर लिहिताना घ्यावयाची खबरदारी :-

०१. प्रथम खबर लिहून काढण्यापूर्वी खबर देण्यास आलेल्या इसमास प्रश्न करुन गुन्हयाची रुपरेषा प्रथम जाणून घ्यावी आणि त्यानंतर त्या इसमाच्या भाषेत अथवा मराठी भाषेत त्या इसमाचा सविस्तर जबाब/फिर्याद/खबर हि आत्मनिवेदन पध्दतीने स्वत: पोलीस ठाणे अंमलदाराने नोंदवावा अथवा हाताखालच्या पोलीस अंमलदाराकडून नोंदवून घ्यावा.

०२. यदाकदाचित ती खबर सविस्तर असेल अगर त्रोटक असेल. परंतु कोणत्याही परिस्थितीत प्रथम खबर नोंदविण्यास नकार देवू नये.

०३. प्रथम खबर यदाकदाचित दुसऱ्या पोलीस ठाणेच्या हद्‌दीत घडलेली असेल अशा वेळी सुध्दा प्रथम खबर नोंदवून घेणे क्रमप्राप्त आहे.

०४. प्रथम खबर देणारा फिर्यादी गुन्हा घडल्यानंतर बऱ्याच उशीराने प्रथम खबर देण्यास पोलीस ठाणेस आल्यावर प्रथम खबर निवेदनात उशीराचे कारण अवश्य नमूद करावे.

०५. मालमत्ता चोरीबाबत अगर घरफोडीबाबत प्रथम खबर देणारा इसम चोरीस गेलेल्या मालमत्तेची प्रथम दर्शनी संपूर्ण यादी देवू शकत नसेल, अशा वेळी बाकी माहिती तपास करुन देईन, असा उल्लेख करुन प्रथम खबर रिपोर्ट तयार करावा आणि नंतर त्यासंबंधी पुरवणी जबाब घ्यावा.

०६. काही घटना प्रथम प्राथमिक तपास केल्यानंतर पोलीस अंमलदारास ती घटना दखलपात्र गुन्हा आहे अशी आढळून येते अशावेळी सदरहू पोलीस अंमलदाराने स्वत:च फिर्यादी होवून प्रथम खबरी रिपोर्ट तयार करावा.

०७. प्रथम खबरी जबाब शक्यतो पुर्ण स्वरुपात नोंदवावा. ती लिहिताना कमीत कमी ५ डब्ल्यू म्हणजेच व्हेन, व्हेअर, व्हू, व्हाय, हाऊ(कधी, कोठे, कोणी, का, कसे/कशी) यांचा समावेश करावा. त्यामुळेच प्रथम खबर महत्त्वाची ठरते.

०८.प्रथम खबर लिहिताना खाडाखोड टाळावी, अक्षरावर अक्षर लिहू नये. चुकीचा मजकूर लिहिला गेला असल्यास तो स्पष्टपणे खोडावा व तेथे संक्षिप्त स्वाक्षरी करावी.

०९.प्रथम खबरी रिपोर्टचा फॉर्म एकदा लिहिण्यास घेतल्यानंतर कोणत्याही सबबीसाठी तो फाडून टाकण्याचा प्रयत्न करु नये कारण त्याच्यावर अनुक्रम क्रमांक असतो. पुराव्याच्या दृष्टीने ही कृती संशयास्पद व आव्हानात्मक ठरते.

१०.प्रथम खबर देणाऱ्यास ती नीट वाचून दाखववावी व तसा उल्लेख करुन त्याची शेवटी सही घ्यावी. तुमचीही सही, हुद्दा, स्थळ, तारीख व वेळ यासह समक्ष या मथळयाखाली अवश्य करावी.

११.यानंतर प्रथम खबरी रिपोर्टचा दर्शनी भाग तत्सम गुन्हयाच्या स्वरुपानुसार प्रत्येक रकान्याप्रमाणे नीट भरावा.

१२.प्रथम खबर अहवालात ज्या प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. त्या गुन्हयाशी संबधीत असलेल्या कलमांमध्ये गुन्हयासंबधी करण्यात आलेल्या व्याख्येचा उल्लेख करणे गरजेचे आहे (उदा. चोरीचा गुन्हा दाखल करतांना कलम ३७८ मध्ये चोरी संबधी नमुद असलेल्या व्याख्येतील संमतीशिवाय, लबाडीचे इराद्याने/ अप्रामाणीकपणे अशा शब्दांचा उल्लेख)

१३.प्रथमखबरी अहवाल हा मद्देसुद व कमीत कमी शब्दात असावा, अनावश्यक बाबी टाळाव्यात. तसेच प्रथमखबरी अहवालात लावण्यात येणारी कलम हि शिक्षेची तरतुद असलेलीच कलमे असावीत.

१४.प्रथम खबर देणाऱ्यास ती नीट वाचून दाखववावी व तसा उल्लेख करुन त्याची शेवटी सही घ्यावी. तुमचीही सही, हुद्दा, स्थळ, तारीख व वेळ यासह समक्ष या मथळयाखाली अवश्य करावी.

१५. यानंतर प्रथम खबरी रिपोर्टचा दर्शनी भाग तत्सम गुन्हयाच्या स्वरुपानुसार प्रत्येक रकान्याप्रमाणे नीट भरावा.

१६. प्रथम खबर नोंदवून घेणे यासंदर्भात ठाणे अंमलदारावर कायदेशीर बंधने आहेत. ती अशी-

(अ) या ना त्या सबबीखाली खबर नोंदवून न घेतल्यास त्याला खात्यामार्फत होणाऱ्या चौकशीला सामोरे जाणे भाग पडेल

(ब) गंभीर स्वरुपाचा दखलपात्र गुन्हा किरकोळ स्वरुपाच्या गुन्हा स्वरुपात हेतुपूरस्करत नोंदवून घेतल्यास तो भा.द.वि. कलम १६६ अगर २१७ खाली अपराध ठरेल

(क) कोणताही दखलपात्र गुन्हा एखाद्या इसमाचा निव्वळ बचाव करण्याच्या हेतूने विसंगत पध्दतीने नोंदवून घेतल्यास तो भा.द. वि. कलम १६७ अगर २१८ चा अपराध ठरेल.

## भारतीय पुरावा कायद्यान्वये प्रथम खबरी बाबतच्या कायदेशी तरतुदी

- कलम ३२:- काही वेळेस फिर्यादी जखमी अवस्थेत असतांना फिर्याद लिहून घेतली जाते. गुन्हा दाखल होतो व नंतर फिर्यादी मयत झाल्यास सदर फिर्याद / जबाब मृत्युपुर्व जबाब मानण्यात येतो. भा.पु.कायद्यामध्ये मृत्युपुर्व जबाबाला विशेष महत्व आहे.
- कलम १४५ :- कोर्टात साक्ष देतांना फिर्यादी विसंगत विधाने करतो अशा वेळी सरकारी वकील पहिल्या खबरीच्या मदतीने त्याला उलट प्रश्न विचारू शकतात.
- कलम १५४ :- काही वेळेस सरकार तर्फेचा फिर्यादी कोर्टात अचानक फितूर होतो. अशा वेळेस पहिल्या खबरींच्या मदतीने उलटतपासणी कराता येते.

## भारतीय पुरावा कायद्यान्वये प्रथम खबरी बाबतच्या कायदेशीर तरतूदी

- कलम १५९ :- दिलेली फिर्याद मोठी असते किंवा फिर्यादीची साक्ष उशीरा होते व त्याला सर्व तपशील आठवत नाही. अशा वेळी तो आधीची फिर्याद वाचून आपले स्मरण शक्तीला उजाळा देऊ शकतो.
- कलम ७४ :- प्रथम खबर हा कलम ७४ नुसार सार्वजनिक दस्तऐवज होतो. त्यामुळे कलम ७७ नुसार त्याचा दुय्यम पुरावा देता येतो.
- सिआरपीसी कलम १५६ :- दखलपात्र अपराधाची पहिली खबर मिळाल्यानंतर पोलीसांना तपासाचे अधिकार प्राप्त होतात.

- प्रथम खबरी अहवाल जबाबाचे
- काही नमुने

# मोटार वाहनाची चोरी

## जबाब

श्री. ........................................................ हिन्दु / ३३ वर्षे, व्यवसाय – नोकरी ,

पत्ता – ........................................................................ यांचा जबाब

मी वरील ठिकाणी माझी पत्नी – .................. व मुलगा – या .......... यांच्या सोबत राहत आहे. मी ......... पदावर ..................पत्ता – ............................................................ या कंपनी मध्ये गेल्या ८ वर्षा पासून काम करीत आहे. कंपनीचे कंपनीच्या कामा करीता तसेच माझ्या वैयक्तिक वापराकरीता मोटार कार क्रमांक ..................... ही दिली आहे. सदरची कार मी सांयकाळी कामावरुन परत घरी आल्या नंतर आमच्या बिल्डिंगच्या कंपाऊड मध्ये पार्क करीत असतो.

आत दिनांक ..................... रोजी ...... वाजता मी कामावरुन परत आलो आणि नेहमी प्रमाणे माझी कार बिल्डिंगच्या आवारात पार्क केली. कार व्यवस्थित लॉक केली आणि घरी निघून गेलो. रात्रौ .............. वाजता जेवण करुन पान खाण्या करीता खाली आलो त्या वेळी माझी कार व्यवस्थित असल्याचे मला आढळले. त्या नंतर मी घरी गेलो

आज दिनांक........................ रोजी सकाळी .......... वाजता मी कामावर जाण्याकरीता निघालो त्सा वेळी माझी कार मी पार्क केलेल्या ठिकाणी आडळून आली नाही. म्हणून मला आश्चर्य वाटले म्हणून मी बिल्डिंगच्या आवारात आणि नंतर आसपासच्या गल्ल्यामध्ये शोध घेतला परंतु कार मिळवून आली नाही, म्हणून कार ही नक्की चोरीस गेली असणार याची खात्री झाली व कार चोरीची तक्रार करण्या करीता पोलीस ठाण्यात आलो.

चोरीस गेलेल्या कारचे वर्णन

१) कारचा रजिस्ट्रेशन क्रमांक –

२) कारचा मेक व मॉडेल –

३) कारचे बॉडीचा प्रकार –

४) कारचा रंग –

५) कारचे चॅसीस नंबर व इंजिन नंबर –

६) एखादे वैशिष्टय किंवा नुकसार वगैरे असेल तर –

माझ्या कारच्या डॅश बोर्ड मध्ये नवीन टेपरेकॉर्ड बाविण्यात आला आहे व कारचे टायर देखील नवीन आहेत. माझ्या कारचे मुळ कागदपत्रे ही कारच्या डॅशबोर्ड मध्ये ठेवण्यात आली आहेत.

दिनांक................ रोजी ............. ते ........ दरम्यान माझी कार दुरुयम चावरच्या पावर करुन कोणीतरी आान इसमाने चोरुन नेली आहेत अशी माझी तक्रार आहे त्या बाबत कायदेशीर कार्यवाही व्हावी ही विनंती आहे.

माझी चोरीस गेलेली कार मोळून आल्यास मी ती ओळखू शकेन.

माझा जबाब मी वाचला तो सत्य आहे.

समक्ष

(फियार्दीची स्वाक्षरी )

पोलीस उप निरीक्षक

........ पोलीस ठाणे मुंबई

# बलात्काराचा गुन्हा

श्रीमती ........................................................................ हिन्दु/३४, व्यवसायः-.............

पत्ताः- ........................................................................................ यांचा जबाब

मी मुळची गावः- ........, तालुकाः- ........, जिल्हा ........ येथे राहणारी आहे. माझा विवाह सन........ या वर्षी श्री........यांच्या बरोबर माझ्या मुळ गावी झाला होता. विवाहानंतर आमचे पटले नाही म्हणून आम्ही फारकत घेण्याचे ठरविले होते व सध्या आमची केस कौटुंबिक न्यायालय, रायगड येथे चालू आहे त्यामुळे आम्ही वेगळे राहत आहोत. मी सध्या ........ येथील बालवाडी मध्ये अर्धवेळ शिक्षिका म्हणून काम करीत आहे.

दिनांक ........ रोजी मी ........ट्रेन नं......... येथून बी.एड. कोर्ससाठी मुंबईतील दादर स्टेशनला उतरले तत्पूर्वी, ट्रेनमध्ये इतर सहप्रवाशांसोबत बोलण्याच्या ओघात ''मी मुंबई मध्ये बी.एड. कोर्स करीता जाणार आहे'' असे सांगितले होते. तेव्हा खालील वर्णनाचे एका सहप्रवाशाने मला सांगीतले की ''तो महापालिकेमध्ये नोकरीस आहे व तो मला बी.एड कोर्सचे प्रशिक्षण घेण्याकरीता मदत करू शकतो.'' सदर इसमाने मला मदत देण्याचे आश्वासन दिल्यामुळे मला त्या व्यक्तीवर विश्वास वाटला.

दादर-मुंबई येथे उतरल्यानंतर त्या व्यक्तीने मला असे सांगितले की, ''दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता तो मला दादर येथे भेटू शकतो व त्याकरीता मी दादर येथील एखाद्या लॉजमध्ये उतरले.'' नंतर तो इसम दादर स्टेशन येथील........लॉज वर मला घेऊन गेला आणि रूम नं.........बुक केल्यानंतर मला लॉजवर ठेऊन निघून गेला.

आज दिनांक........रोजी सकाळी ९ वाजता सदर इसम माझ्या रूम वर आला आणि बी.एड. शिक्षण बाबत चर्चा करू लागला, मी माझी शिक्षणाची प्रमाणपत्रे त्यांनी पुन्हा दाखविली आणि नंतर तो माझ्या वैयक्तिक जीवनाबाबत प्रश्न विचारू लागला व पुढे त्याने ''माझी अंगयष्टी चांगली आहे व माझी जवानी फुकट जाणे चांगले नाही'' असे मला म्हणाला. सदर इसमाच हेतू माझ्या लक्षात येऊ लागला म्हणून ''मी त्यास तात्काळ लॉज वरून जाण्यास'' सांगितले, परंतु त्याने माझ्या अंगाशी लगट करण्याचा प्रयत्न केला म्हणून मी उठले आणि त्यास 'लॉजच्या मालकाला तक्रार करेन' अशी त्यास धमकी दिली व दरवाजाच्या दिशेने जाऊ लागले. त्यावेळी त्या इसमाने झटकन पुढे होऊन कडी आतून लावून घेतली आणि मला काही कळण्यापूर्वी माझ्या तोंडावर हात ठेवला आणि जबरदस्तीने मला मागे खाटवर ढकलले. या अचानक झालेल्या घटनेमुळे मी अत्यंत घाबरून गेले व शक्य तितका प्रतिकार करू लागले परंतु त्या इसमाने त्याचा उजवा हात माझ्या गळ्या जवळ धरला, डाव्या हाताने माझे दोन्ही हात छातीकडे दाबून धरले, आणि नंतर त्याचे शरीराचे वजन व दोन्ही पाय यांची माझा प्रतिकार रोखून धरला, काही क्षण मी प्रतिकार केला परंतु त्याने माझ्या गळ्याजवळ हात ठेवल्याने माझी प्रतिकार निष्प्रभ झाला. क्षणात त्याने माझा गाऊन वर केला माझी चड्डी जबरदस्तीने खाली ओढली आणी स्वतःची पॅन्ट व अंडरपॅन्ट खाली सरकवून माझ्यावर जबरीचा संभोग केला, ही झटपट सुमारे ........ मिनीटे चालली परंतु नंतर शक्तिहीन झाले. त्यानंतर त्या इसमाने झटपट पॅन्ट घातली व ''तुझी बदनामी होईल कोणाला बोलू नकोस'' असे म्हणून एके मिनीटात तेथून निघून गेला.

या अचानक झालेल्या घटनेमुळे मी अत्यंत घाबरून गेली होते, काही क्षण काय करावे हे मला सुचेना, परंतु नंतर मी माझे कपडे घातले व बेल वाजवून रूमबॉयला बोलविले व त्यास साफसफाई करणाऱ्या महिलेस पाठवून देण्यास सांगीतले आणि साफसफाई करणारी महिला नामे इंदु तेथे आली, तिला घडलेली हकिगत सांगितली, नंतर तिने या बाबत हॉटेल मॅनेजर बरोबर चर्चा करून नंतर तक्रार करण्यारिता माझ्या सोबत पोलीस ठाण्यास आली.

सदर इसमाचे त्याचा पत्ता मला दिलेला नव्हता फक्त तो महापालिकेचा कर्मचारी होता एवढेच मला माहित आहे. त्या इसमास मी पुन्हा पाहिल्यास ओळखू शकेन.

आरोपीत इसमाचे वर्णन :-

नाव माहित नाही. वर्णः- बांधा, उंची अंगातः- --- रंगाचा शर्ट, --- रंगाची पॅन्ट, त्याचे नाकावर जुन्या माराची खुण होती.

नमुद इसमाने माझ्या संमती शिवाय माझ्यावर जबरीचा संभोग केला अशी माझी तक्रार आहे. सदर घटनेचे वेळी मी अंगात घातलेली गाऊन, चड्डी आता मी पोलीसांना सादर करीत आहे, ज्यावर तिन ठिकाणी विर्याचे डाग आहेत.

माझी वैद्यकिय तपासणी करून घेण्यास मी तयार आहे.

माझा जबाब मी वाचला तो सत्य आहे.

समक्ष (फिर्यादीची स्वाक्षरी)

# लहान मुलीवर बलात्कार झाला तिच्या वडिलांची तक्रार

श्री ....................................................................................... हिन्दु/............. वर्षे,

व्यवसायः-................. पत्ताः- ......................................................................... यांचा जबाब

मी वरील ठिकाणी माझी पत्नी :- ......., मुलगा :- ......., मुलगी :- ....... यांच्या सोबत राहत आहे. मी ....... ठिकाणी ....... नावाचे दुकान चालवितो व माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

माझी मुलगी :- ....... ही ....... शाळेची विद्यार्थीनी आहे व या वर्षी ती ....... या वर्गात आहे. रोज सकाळी सुमारे ....... वाजता ती शाळेत जाते आणि सुमारे ....... वाजता घरी परत येते. आज दिनांक ....... वाजता मी सकाळी ....... वाजता माझे घर सोडले आणि दुकानावर गेलो. सायंकाळी ....... वाजता घरी आलो त्यावेळी माझ्या पत्नीने मला कळविले कि, ''माझी मुलगी.......ही अद्याप शाळेतून परत आलेली नाही आणि या बाबत शेजारपाजरच्या लोकांनी शाळेमध्ये जावून शोध घेतला परंतु उपयोग झालेला नाही.'' सदरची माहिती मिळताच मी प्रथम माझ्या आसपासच्या सर्व नातेवाईकांना दूरध्वनी वरून संपर्क साधला आणि माझी मुलगी त्यांचे घरी वगैरे पोहोचलेली नाही याची खात्री करून घेतली आणि नंतर आम्ही मुलगी हरविल्याबाबत तक्रार करण्याकरीता ....... पोलीस ठाण्यास गेलो. व मुलगी हरविल्याबाबत ......./२००३ प्रमाणे तक्रार केली. त्यानंतर आम्ही शाळा आणि आमच्या राहण्याच्या ठिकाणाच्या आसपासचा परिसर पुन्हा शोधून काढला परंतू उपयोग झाला नाही.

आज दिनांक.......रोजी सकाळी लोक प्रातः विधीकरीता ....... ठिकाणी गेले त्यापैकी ....... यांनी माझ्या मुलीचा मृतदेह नाल्याजवळ पडलेला पाहिला म्हणून त्यांनी ही गोष्ट आसपासच्या लोकांना सांगितली तेव्हा इतर लोकांनी जाऊन पाहिले त्यावेळी ....... यांनी सदरची मुलगी ही माझी असल्याचे ओळखले म्हणून त्यांनी माझ्या घरी येऊन कळविले. तात्काळ आम्ही त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता, माझ्या मुलीला मी ओळखले, तिच्या शरीराची अवस्था खालील प्रमाणे होती.

तिच्या तोंडामध्ये पालोपाचाळा कोंबण्यात आला होता. तिचे डोळे हे विस्फारलेले व केस विस्कटलेले होते. तिच्या अंगावरील शाळेचा निळ्या रंगाचा फ्रॉक वर झाल्यामुळे आणि आतली चड्डी अंगात नसल्या मुलगी अर्ध विवस्त्र स्थितीत होती, तिच्या कमरेचा कपडी पट्टा ४ फुटावर पडलेला होता. तिचे दफ्तर झुडुपामध्ये पडलेले होते. तिची सफेद रंगाची चडी झुडपात टाकून दिली होती. सदरचे दृष्य पाहिल्यानंतर आसपासच्या बायकांनी पुरूष मंडळींना बाजूला होण्यास सांगितले आणि मुलीच्या शरीराची पाहणी केली त्यावेळी तिच्या योनीतून रक्त येताना व शाळेच्या स्कटवर रक्ताचे थेंब पडलेले त्यांना आढळले तसेच मानवी विर्य पडल्यामुळे स्टकचा काही भाग कडक झालेला आढळला. त्यामुळे ....... हिचे वर बलात्कार झाला असावा हे निश्चित झाले. म्हणून तात्काळ आसपासच्या लोकांनी जवळ असलेल्या बिट चौकीला संपर्क साधला.

घटनास्थळी असलेली परिस्थिती विशेषतः ....... तिच्या तोंडात कोंबलेला पालापाचोळा, योनी वर असलेले रक्त, तिची असलेली अर्धनग्न परिस्थिती, तिचे कपड्यावर असलेले मानवी विर्यासारखे डाग हे पाहिल्यानंतर निदर्शनास येते कि, कुणीतर माझ्या मुलीवर बलात्कार केला आहे आणी तोंडात पालापाचोळा कोंबून तिच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे.

माझी अज्ञात इसमाचे विरूद्ध.......हिच्यावर बलात्कार करून तिचा खून केल्याची तक्रार आहे. माझ्या तक्रारी बाबत कायदेशीर कार्यवाही व्हावी ही विनंती आहे.

माझा जबाब मला मराठीमध्ये वाचून आणि हिन्दी मध्ये समजावून सांगण्यात आला तो सत्य आहे.

समक्ष

फिर्यादीची स्वाक्षरी

पोलीस उप निरीक्षक,<br>
...... पोलीस ठाणे,<br>
मुंबई

## अपघाताचा गुन्हा

### (प्रत्यक्ष अपघात घडताना पहिलेला नाही अशा गुन्ह्यात पोलीस अंमलदाराची फिर्याद )

श्री .................................................................................... हिन्दू / .......

व्यवसाय :- ............... पत्ता........................................................... यांचा जबाब

मी वरील ठिकाणी माझी पत्नी आणि मुलांसह रहात आहे. मी बृहन्मुंबई पोलीस दलात .......... .................. पासून पोलीस हवालदार या पदावर नोकरी करीत आहे. माझा पट्टा क्रमांक ........... असा आहे. दिनांक ...................... पासून माझी नेमणूक ............................ पोलीस ठाण्यात असून सध्या मी .................... येथील चौकीचा हवालदार म्हणून काम पहात आहे.

आज दिनांक .............. रोजी .......... वाजता मी डयुटी वर हजर झालो सुमारे ......... ........ वाजता मी व पो. शि. क्र. .............. व पो. शि. क्र. इत्यादी चौकीवर उपस्थित होतो त्यावेळी पोलीस नियंत्रण कक्षाचे पो. उ. नि................ यांनी संदेश दिला की, ............. या ठिकाणी मोठा अपघात झाला आहे म्हणून तात्काळ घटनास्थळी रवाना व्हावे, सदरचा संदेश आल्याबरोबर मी तात्काळ नमुद शिपायांना घेऊन ......................... या ठिकाणी गेलो त्या ठिकाणी गर्दी झालेली दिसली व त्या ठिकाणी एका ४० वर्षे वयाच्या इसमाचा मृतदेह रस्त्यावर पडलेला दिसला. मी तात्काळ मृताचे आसपास दगडी ठेवल्या व येणाऱ्या वाहनांना अडथळा होणार नाही व वाहतूक सुरळीत चालावी याकरीता तात्पुरते बॅरीकेट तयार केले व घटनास्थळाची पाहणी केली असता मला आढळले की, ........ कडून ..... कडे म्हणजेच (.... दिशेने .... दिशेकडे जाणाऱ्या) अज्ञात वाहनाने धडक दिल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता,

मयत इसम हा अंदाजे ............... वर्षाचा होता. त्याचा वर्ण :- .........आहे. उंची :- .... ................. आहे. त्याचे अंगात चॉकलेटी रंगाचा शर्ट व काळया रंगाची फुल पॅन्ट असुन मृतदेह हा रस्त्यावर आपटुन नंतर सरपटत गेल्यामुळे शर्ट व पॅन्ट घासून फाटलेली आहे. मृताचे डोके फुटलेले असून त्याच्या डोक्यातून मेंदू बाहेर आलेला आहे आणि डोक्यावर जोराचा मार बसला असल्याने त्याचे दोन्ही डोळे बाहेर आलेले दिसत आहेत. त्याचे मांडी वरुन वाहन गेल्यामुळे त्याच्या दोन्ही मांडीचे हाड तुटलेल्या स्थितीत आहे. आसपास पाहणी केली असता उत्तर-दक्षिण जाणारा सुमारे १५ फुट लांबीचा स्पीड मार्क रस्त्यावर स्पष्ट पणे आढळला. त्याचप्रमाणे रेस्त्यावर काचेचे तुकडे व टेल लाईटची प्लास्टीकची पिवळी व लाल रंगाचे लाईट कव्हरचे तुकडे आढळले. रस्त्यावर मृताचे डोक्याचे खाली रक्ताचे एक थारोळे आढळले.

ही घटना प्रत्यक्ष पाहणारा कोणीही इसम पुढे आला नाही,. घटनास्थळ व मृतदेहाची पाहणी करता, कोणी अज्ञात वाहनाची धडक लागल्यामुळे सदर व्यक्तीचा मृत्यु झाल्याचे निष्पन्न झाले आहे. मयताचे खिशामध्ये पाकीट वगैरे मिळून आले नाही त्यामुळे त्याचे नाव व पत्ता याबाबत माहिती मिळालेली नाही.

माझी अनोळखी इसमाला अज्ञात वाहन चालकाने बेदरकारपणे व अविचाराने वाहन चालवून पादचारी इसमास धडक देऊन त्यास गंभीररित्या जखमी करुन त्याच्या तात्काळ मृत्यूस कारणीभूत झाल्याबाबत तक्रार आहे, याबाबत कायदेशीर कार्यवाही व्हावी ही विनंती आहे.

माझा जबाब मी वाचला तो माझ्या सांगण्याप्रमाणे सत्य आहे.

समक्ष

(.............................)

(.......................................) फिर्यादीची स्वाक्षरी

पोलीस उपनिरिक्षक,

...................... पोलीस ठाणे, मुंबई.

टीप : अपघात प्रत्यक्ष पाहिला नसला तरीदेखील कॉन्ट्रीब्युटरी निग्लीजन्स हे तत्व अपघाताच्या गुन्ह्यात मान्य नसल्याने वाहनचालका विरूध्द गुन्हा दाखल करता येतो.

## अपघाताचा गुन्हा
## (लॉरी फुटपाथवर चढली व एका व्यक्तीच्या मृत्यूस कारणीभूत झाली)

श्री ..........................................................................................हिन्दू / .......
व्यवसाय :- ................ पत्ता.............................................................. यांचा जबाब

मी व्यवसायाने रिक्षा चालक आहे. माझा रिक्षा चालविण्याची अनुज्ञाप्ती क्रमांक .................. असा आहे. माझा बॅच क्रमांक .......................... असा आहे. सध्या मी एक श्री ................. .................................. यांची रिक्षा क्रमांक .......................... ही एक वर्षाच्या कंत्राटने चालविण्याकरिता घेतली आहे.

आज दिनांक ........................रोजी ............... वाजता मी माझी रिक्षा धंद्याकरिता बाहेर काढली. त्यानंतर सुमारे ................. वाजता मी माझी रिक्षा .......... उभी करुन प्रवासी येण्याची वाट पहात होतो. त्यावेळी मी पाहिले कि, एक लॉरी क्रमांक ................. ही ......................... येथून ................. येथे आली (म्हणजेच ............. दिशेने ............. दिशेकडे आली) व नंतर सदर लॉरी चालकाने भरधाव वेगाने डावीकडे म्हणजेच ................................ रस्त्यावर वळण घेण्याकरीता वळविली त्यावेळी अचानक लॉरी चालकाचे लॉरी वरील नियंत्रण सुटले व लॉरी ही डिव्हायडर वर चढली आणि डिव्हायडर वर उभ्या असलेल्या इसमाच्या शरीराला जोरदार धडकली त्यामुळे तो पादचारी जोरदारपणे रस्त्यावर आपटला आणि जागच्या जागी त्याने तडफडायला सुरुवात केली.

मी तात्काळ त्या ठिकाणी धावलो तेव्हा मी पाहिले कि, जखमी इसम हा तडफडत होता व त्याचे नाकातून व तोंडातून रक्त येत होते. मी तात्काळ जवळ असलेल्या रामभरोसे हिन्दु हॉटेल येथे गेलो आणि पाणी घेऊन आलो व त्या जखमी इसमाला पाणी पाजण्याचा प्रयत्न केला परंतू तो जोरजोराने श्वासोच्छवास घेऊ लागला व त्याचे छातीमध्ये दुखत आहे असे सांगू लागला त्यावेळी मी एका टॅक्सीवाल्यास मदतीकरिता बोलावले परंतु त्या जखमी इसमाने त्याच ठिकाणी प्राण सोडले. त्यानंतर माझा त्यास रुग्णालयात घेऊन जाण्याचा इरादा होता परंतु टॅक्सी चालकाने मला ''ये तो पुलिस केस है अभी पुलीसको ही आने दो'' असे सांगितले तेव्हा त्याने धावतच जवळ असलेल्या बिट चौकीवर जावून याबाबतची हकीकत तेथील पोलिसांना सांगितली.

अपघात करणाऱ्या लॉरीचा चालक हा त्याची लॉरी सोडून पळून गेला होता. त्या लॉरीची कागदपत्रे मी चौकीवरील पोलीसांच्या ताब्यात दिली. त्यानंतर काही वेळाने पोलीस तेथे चौकशी करीता आले तेव्हा मी त्यांना वरील जबाब दिला.

मयाताच्या अंगावरील डायरी पाहिली असता मयत इसमाचे नाव हे ................................ ......................... व पत्ता ................................................. असल्याचे लोकांना कळले. अपघाता मध्ये लॉरीची धडक श्री. ................................. यांच्या छातीला बसल्यामुळे धडक लागल्यानंतर काही वेळातच त्यांचा मृत्यू झाला होता. त्याचप्रमाणे रस्त्यावर जोरदारपणे आपटल्यामुळे त्यांच्या डोक्याला जबरदस्त दुखापत झाली होती व डोके फुटले होते.

या अपघाताचा मी प्रत्यक्ष साक्षीदार आहे. माझी लॉरी क्रं. ...................................... चे चालकाने लॉरी अविचाराने चालवून पादचारी श्री. ................................................ यांना धडक देऊन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याबाबत तक्रार आहे, याबाबत कायदेशीर कार्यवाही व्हावी ही विनंती आहे. पळून गेलेल्या लॉरी चालकास पुन्हा पाहिल्यास मी ओळखू शकेन. माझा जबाब मी वाचला तो माझ्या सांगण्याप्रमाणे सत्य आहे.

समक्ष | फिर्यादीची स्वाक्षरी

## अपघाताचा गुन्हा
## (सिग्नलवर उभ्या असलेल्या वाहनास पाठीमागून धडक दिली)

श्री ........................................................................................हिन्दू/.......
व्यवसाय :- ....................पत्ता.............................................................यांचा जबाब

मी वरील ठिकाणी माझी पत्नी :-.................................. व चार मुलांसह रहात आहे. मी व्यवसायाने दूध विक्रेता आहे व ........................................... या ठिकाणी मी ........ ........................................... नावाचे दुकान चालवितो. माझी स्वतःची मोटार सायकल ... .................... ही आहे. मी अधून मधून माझी सायकल ही माझ्या व्यवसायाकरिता वापरत असतो.

आज दिनांक ........................ रोजी .................... वाजता ...................... या ठिकाणी माझी मोटार सायकल घेऊन गेलो होतो. नंतर सुमारे ........... वाजता मी ............... या रस्त्यावरुन .................................. कडून .......................................... कडे (म्हणजेच .............................. कडून .......... या दिशेने आलो आणि ................. ....... जंक्शन येथील सिग्नलवर इतर वाहनाच्यासह मोटार सायकल उभी केली व हिरवा सिग्नल पडण्याच्या प्रतिक्षेत होतो. त्यावेळी माझ्या पाठी मागून त्याच मार्गाने (म्हणजेच ............... कडून ............ कडे) एक बी. ई. एस. टी. ही भरधाव आली व सिग्नलवर उभ्या असलेल्या माझ्या मोटार सायकलला मागून धडकली त्यामुळे मी ५ फूट लांब फेकलो गेलो व माझे डोके डिव्हायडरच्या कडेला धडकले आणि त्यामुळे माझ्या डोक्याला मोठी दुखापत झाली व मोटार सायकलचे नुकसान झाले.

तात्काळ आसपासचे लोक त्या ठिकाणी जमा झाले व मला त्याच बी. ई. एस. टी. बसमध्ये घालून ............... रूग्णालयात उपचाराकरिता आणले. माझ्या हातावर एका पादचारी इसमाने सदरचे बी. ई. एस. टी. बसचा क्रमांक लिहून ठेवला होता तो .................... असा आहे. व सदरचे वाहन चालकास पोलीसांनी चौकशी करीता ताब्यात घेतल्याचे मला रुग्णालयात कळले. या अपघातामुळे माझ्या डोक्याला दुखापत झाली आहे व माझ्या कंबरेचे हाड मोडले आहे व ते अत्यंत दुखत आहे. त्याच प्रमाणे माझ्या मोटार सायकलचे नुकसान झाले आहे.

माझी मोटार सायकल ही ........................................... सिग्नल वर इतर वाहनाचे सह उभी असता बी. ई. एस. टी. क्रमांक ................................चे चालकाने त्याची बस ही अविचाराने चालवून माझ्या मोटार सायकलला पाठीमागून धडक देऊन मला गंभीर दुखापत करण्यास व माझ्या मोटार सायकलचे नुकसान करण्यास कारणीभूत झाला म्हणून माझी त्याचे विरुध्द तक्रार आहे, याबाबत कायदेशीर कार्यवाही व्हावी ही विनंती आहे.

माझा जबाब मी वाचला तो माझ्या सांगण्याप्रमाणे सत्य आहे.

समक्ष फिर्यादीची स्वाक्षरी

(............................................)

(......................................)

पोलीस उपनिरिक्षक,

..................... पोलीस ठाणे, मुंबई.

> टीप : सिग्नलवर उभ्या असलेल्या वाहनाला पाठीमागून धडक दिली यात स्पष्टपणे बी.ई.एस.टी. ड्राईव्हरची चूक आहे. काही वेळा जखमी इसमाच्या हातावर पादचारी इसम अपघातातील वाहनाचा क्रमांक लिहून देतात अशा वेळेला त्याची नोंद एफ.आय.आर. मध्ये येणे आवश्यक आहे.

## अपघाताचा गुन्हा
### (सिग्नल तोडून पादचारी इसमास धडक देऊन गंभीर जखमी केले)

श्री ........................................................................................हिन्दू /.........
व्यवसाय :-..................पत्ता...................................................................... यांचा जबाब

मी वरील ठीकाणी ............ वर्षापासून माझी पत्नी :-...............व आई :- ........... यांच्यासोबत रहात आहे. मी .......................................... पत्ता :- ...................... ..............................................या कंपनी मध्ये ........................ या पदावर गेल्या ................ वर्षा पासून नोकरी करीत आहे.

आज दिनांक .................. रोजी ..................वाजता मी माझ्या वैयक्तीक कामानिमित्त ........................................ येथे गेलो होतो. माझे काम संपल्यानंतर सुमारे ......... वाजता मी ............................ येथे जाण्याकरीता ........................ च्या सुमारास असलेल्या बी. ई. एस. टी. क्रमांक ............................ च्या थांब्यावर उभा होतो.

त्यावेळी .................. रस्त्यावर दक्षिणेकडून उत्तरेकडे (म्हणजेच ......... कडून ........ कडे) वाहतूक होत होती. सुमारे ...... वाजता एक मोटर कार दक्षिणेकडून (म्हणजेच ............. येथून सिग्नल जवळ एक कार आली आणि कार चालकाने त्याची कार सिग्नलवर न थांबविता पुढे जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले व अचानक त्याने कार डाव्या बाजूला वळविली व रस्ता पार करण्याकरिता उभ्या असलेल्या पादचाऱ्याला धडकली. तात्काळ आसपासचे लोकांसह मी त्या ठिकाणी धावलो आणि जखमी इसमाला रुग्णालयात औषधोपचाराकरीता अपघात करणाऱ्या कारचालकाच्या मदतीने त्याच्याच कारमधून घेऊन गेलो.

अपघात करणाऱ्या कारच क्रमांक ............................................ असा आहे व हा इसम (कारचालक याच्याकडे बोट दाखवून) चालवीत होता. रुग्णालयात जखमी इसमाचे नाव हे ............... ..................................................... असल्याचे मला कळले व त्यास औषधोपचारा करीता ऑपरेशन थिएटर मध्ये नेल्याचे व त्याचे दोन्ही पाय फ्रॅक्चर असल्याचे कळले. कारचे चालक ..... ........................................................ यांनी त्याची कार वरील प्रमाणे भरधाव चालवून पादचारी श्री ...................................................................... यांना गंभीर जखमी केल्या बाबत माझी तक्रार आहे त्याबाबत कायदेशीर कार्यवाही व्हावी ही विनंती आहे.

माझा जबाब मी वाचला तो सत्य आहे.

समक्ष फिर्यादीची स्वाक्षरी

(.........................................)

(.........................................)

पोलीस उपनिरिक्षक,

...................... पोलीस ठाणे, मुंबई.

> टीप : आपण जेव्हा गुन्हा दाखल करतो तेव्हा वाहनचालकाची स्पष्ट चूक त्यातून निदर्शनास यायला हवी. वाहनचालक व पादचारी हे कोठून कोठे चालले होते (तसेच कोणत्या दिशेकडून कोणत्या दिशेकडे चालले होते हे नमूद केल्यास जबाबात सुसंगतपणा येईल.

## सोन्या चांदीच्या दुकानाची घरफोडी ( प्रथम खबरी अहवाल )

श्री. ------------------------------------------ हिन्दु / ४०, व्यवसाय - ---------,

पत्ता --------------------------------- यांचा जबाब.

मी वरील ठिकाणी माझी पत्नी,---अ---, मुलगा ---ब--- यांच्या सोबत राहतो व मी ---कखग--- ज्वेलर्स, पत्ता ----------------------- या दुकानाचा मी मालक आहे, आणि गेली ------ वर्षे मी सोन्याचे दागिने विकण्याचा व्यवसाय सदर ठिकाणी करीत आहे. माझा मुलगा ---ब--- हा अधुन मधुन मला व्यवसाय चालविण्यात मदत करीत असतो.

माझ्या दुकानाचे क्षेत्रफळ हे अंदाजे ------------- स्केअर फुट असुन त्यामध्ये एक मुख्य दुकानाची रुम, एक दागिन्यांची दुरुस्त करण्याची छोटी खोली, एक आतील छोटी रुम ज्या ठिकाणी मोठी गोदरेजची लोखंडी तिजोरी ठेवण्यात आलेली आहे. सदरची तिजोरी हिला भिंतीमध्ये फिट करण्यात आली आहे. सदर रुमच्या एका कोपऱ्यात छोटे टॉयलेट आहे. सदर रुमच्या पाठी भिंतीला वातानुकुल मशीनचा बॉक्स आहे व त्यामध्ये मशीन बसविण्यात आली आहे, त्यातुन थंड हवेचा पुरवठा दुकानाला होत असतो. सदर दुकानामध्ये एक ९० स्वेअर फुट आकाराचा मॅझनीन फ्लोअर आहे, त्यावर दुकानाचे अडगळीचे साहित्य असते. दुकानाच्या प्रवेशद्वारावर लोखंडी रोलींग शटर व एक लोखंडी स्लायडींग शटर बसविण्यात आले आहे.

माझ्या दुकानात काम करण्याकरिता दोन मदतनीस व एक कारागीर असा स्टाफ आहे. दुकानामध्ये शो केस मध्ये लावण्यात येणारे दागिने हे, रात्री दुकान बंद करण्यापूर्वी आम्ही तिजोरी मध्ये ठेवत असतो परंतु काही दागिने हे शोकेसमध्ये तसेच ठेवत असतो. सकाळी १० वाजता दुकान सुरू होते व दुपारी १३.०० ते १५.०० दरम्यान आम्ही दुकान जेवणाच्या सुट्टीकरीता बंद करतो आणि १५.०० वाजता दुकान उघडल्यानंतर सायंकाळी २०.०० वाजता बंद करतो. दुकानाच्या सर्व चाव्या या माझ्याकडेच असतात.

आज दिनांक ------------- रोजी ------- वाजता मी, व माझा मदतनीस ---ट--- आणि ---ठ--- यांनी तिघांनी दुकान उघडले. त्यानंतर आम्ही तिजोरीतील दागीने, दुकानातील शोकेसमध्ये लावले आणि नंतर दुकानाचा कारभार पाहिला. सुमारे १३.०० वाजता मी दुकान बंद केले आणि जेवणाकरिता निघून गेलो. सुमारे १५.०० वाजता आम्ही दुकान उघडण्याकरिता आलो. मी माझ्याकडील चाव्यांनी दुकानाचे दोन्ही शटर उघडले आणि दुकानात जावुन पाहिले तर आम्हांला आश्चर्याचा धक्का बसला कि, शोकेसमध्ये ठेवण्यात आलेले खालील वर्णनाचे सर्व दागिने तेथून चोरीस गेले होते. शोकेशच्या सर्व काचा उघड्या होत्या. त्यातील दागिन्यांचे बॉक्स हे रिकाम्या स्थितीत होते व दागिने नाहीसे झाले होते. दुकानाच्या शोकेस काउन्टर वर दोन पाने व दोन स्क्रु ड्रायव्हर अशी हत्यारे होती, तात्काळ आम्ही तिजोरीतील साहित्य तपासले असता तिजोरीतील दागिने हे व्यवस्थित असल्याचे आढळले. आम्ही अधिक पाहणी केली असता दुकानाच्या पाठच्या भिंतीचे मागे बसविण्यात आलेल्या वातानुकुलीत मशीनचा बॉक्स उघडण्यात आला होता. अधिक पाहणी केली असता कोणीतरी अज्ञात इसमाने ए.सी. मशीन बाजुला ढकलुन त्या मागे दुकानात प्रवेश केला होता व दागीने चोरुन नेले होते.

तात्काळ आम्ही ही बाब आसपासच्या दुकानदारांच्या लक्षात आणून दिली आणि त्यांनी कोण संशयीत इसम वगैरे पाहिला होता किंवा कसे याबाबत चौकशी केली परंतु याबाबत आम्हास कोणीही उपयुक्त माहिती दिली नाही. दुकानातील तिजोरी ही ---- या कंपनीने बनविली आहे. तिजोरीच्या मुख्य दरवाजाचे की-होल असून त्यावर ओरखडे असल्याचे स्पष्ट दिसत आहे, यावरुन मी या निष्कर्षाला पोहचलो की गुन्हेगाराने दुय्यम चावीचा वापर करुन तिजोरी देखिल उघडण्याचा प्रयत्न केला असावा.

चोरीस गेलेल्या दागिन्यांची मी आता यादी सादर करीत आहे. ही यादी तिजोरीत ठेवण्यात आलेल्या नोंदवहीतील उतारा पाहुन मी सादर करीत आहे व नोंदवहिची एक झेरॉक्स प्रत सादर करीत आहे.

अंदाजे खालील नमुद दागिने हे चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये आहेत.

१) ----------------------------------.

२) ----------------------------------

३) ----------------------------------

४) ---------------------------------- एकूण रक्कम =

आम्ही ज्या ठिकाणाहून सोने खरेदी करतो आणि ज्या ठिकाणाहून दागिने तयार करवून घेत असतो त्या दुकानदारांच्या पावत्या व कागदपत्रे मी आता माझ्या जबाबाच्या पृष्ठयर्थ सादर करीत आहे.

वर नमुद दागिन्यांने खेरीत आणखी काही वस्तू किंवा दागिने चोरीस गेले असतील तर मी चौकशी करुन व पहाणी करुन आपणास कळवीन.

दागिन्यांचे बाबत आवश्यक तो आणखी काही कागदपत्रे आवश्यक असतील तर मी ती आपणांस सादर करेन. वर नमुद दागिने हे मी पुन्हा पाहिल्यास ओळखू शकेन.

आज रोजी दुपारी १३.०० ते १५.०० दरम्यान आम्ही जेवणाच्या सुट्टीकरिता दुकान बंद केले असता दुकानाच्या पाठच्या भिंतीवरील ए.सी.मशीन उघडून कोणी अज्ञात इसमाने दुकानात प्रवेश केला आणि शोकेसमध्ये ठेवण्यात आलेले दागिने चोरुन नेले अशी माझी तक्रार आहे त्याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी ही विनंती आहे.

माझा जबाब मी वाचला तो माझ्या सांगण्याप्रमाणे सत्य आहे.

समक्ष

(फिर्यादीची स्वाक्षरी)

(---------------------------)

पोलीस उप निरीक्षक

------------- पोलीस ठाणे, मुंबई.

टीप : घरफोडी किंवा राहत्या घरातील चोरी वगैरे गुन्ह्यात जबाब नोंदविताना सुरुवातीला साधारणपणे घराचे एकूण क्षेत्रफळ किती ?, एकूण खोल्या किती ? यांचा उल्लेख करावा, त्यामुळे जबाब आणि पंचनामा यामध्ये सुसूत्रता येते.

प्रस्तुत गुन्ह्यातील गुन्हाप्रणाली ही अट्टल घरफोड्या विनोद सिंग उर्फ विनोद जयस्वाल या गुन्हेगाराची आहे. विनोद सिंग हा प्रथम दुकानाची पाहणी करीत असेल १) ज्या दुकानाच्या पाठच्या बाजूला ए.सी. मशिन लावलेली आहे. २) ज्या दुकानाला मॅजनिंग फ्लोअर आहे ३) जे दुकान दुपारी जेवणाच्या सुट्टीकरीता बंद असते, अशा सोन्याचांदीच्या दुकानात तो चोरी करीत असे. विनोद सिंग हा सकाळच्या वेळी दुकानाच्या पाठची ए.सी. मशिन युक्तीने उघडत असेल व दुकानात प्रवेश करीत असेल. आणि मॅजनिन फ्लोअरवर जाऊन लपून बसत असेल. दुकानदार सकाळी तिजोरी उघडून दागिने शोकेस मध्ये लावत असत. आणि दुपारी जेवणाच्या सुट्टीकरीता दुकान बंद करीत असत. जेवणाच्या सुट्टीकरीता दुकान बंद झाल्यावर दुकानाच्या मॅजनिन फ्लोअर वरुन उतरुन खाली येत असेल. आणि सर्व दागिने गोळा करुन पळून जात असेल.

## कलम ३७ (१) मुंबई पोलीस कायद्याप्रमाणे ताब्यात चाकु बाळगल्या बाबतचा गुन्हा

श्रीमती .................................................................................... हिन्दु / ३५,
व्यवसाय :- पत्ता :-.................................................................... यांचा जबाब,

मी बृहन्मुंबई पोलीस दलात ........................ पासुन पोलीस शिपाई या पदावर नोकरी करीत आहे. माझा पट्टा क्रमांक .................... असा आहे. दिनांक ............................ पासून मी .......................... या पोलीस ठाण्यास नेमणूकिस आहे. सध्या मी पोलीस ठाण्याच्या सर्वेलन्स स्टाफमध्ये नोकरी करीत आहे.

आज दिनांक ........................ रोजी .................... वाजता मी कामावर हजर झालो व नंतर ................. वाजता नेमून दिलेल्या कामाप्रमाणे पो. शि. क्रं.................... यांच्याबरोबर गस्तकामी ............................ येथे रवाना झालो. मुंबईमध्ये दर १५ दिवसानंतर मा. पोलीस आयुक्त यांचे प्रतिबंधात्मक आदेश जारी होत असतात, त्याप्रमाणे सध्या तसे प्रतिबंधात्मक आदेश जारी असून या आदेशांची यथोचित प्रसिध्दी आमच्या पोलीस ठाण्याने केलेली आहे.

सुमारे ......................................... वाजता आंम्ही ....................... या ठिकाणी आरोपी ......................... याचे चौकशी करीता जाणार होतो त्यावेळी आम्हांला सार्वजनिक नळावर गर्दी झालेली दिसली म्हणून आम्ही पुढे जाऊन विचारणा केली असता एक रमेश सखे व एक राजीव पाटील याचे दरम्यान पाणी भरण्यावरुन वाद झाला असे समजले, त्याच वेळी बाजूच्या बोळातून आरडाओरडा ऐकू आला म्हणुन आंम्ही तेथे गेलो त्यावेळी या इसमाला (आरेपी रमेश सखे याचे कडे बोट दाखवून) त्याचे घरातील लोक हे ''जाऊ दे रमेश, भानगड करु नकोस'' असे म्हणून त्यास रोकण्याचा प्रयत्न करताना दिसले, त्याचवेळी मी पाहिले कि, रमेशच्या हातात एक वस्तरा होता व तो पाटीलच्या घराकडे जाण्याचा प्रयत्न करीत होता व त्याचे घरातील लोक त्यास थांबवित होते. तात्काळ आंम्ही पुढे होऊन रमेश याला पोलीस असल्याचे सांगितले व घेऊन पोलीस ठाण्यास आलो.

वस्तऱ्याचे वर्णन :- या वस्तराचे पाते ................. इंच लांब असून त्याची मुठ ............ इंच जलांब अशी एकूण ...................... इंच लांबी आहे. वस्तऱ्याची मुठ ही सफेद प्लास्टीकची आहे. वस्तऱ्याचे पात्यावर ................ अशी अक्षरे आहेत. वस्तऱ्याचे पाते थोडेसे वाकडे आहे.

आता मी आरोपी ......................... आणि त्याचेकडून जप्त केलेला वस्तरा पोलीस ठाण्यात सादर करीत आहे.

यातील आरोपी ..................... याने मा. पोलीस आयुक्त यांच्या प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करुन ताब्यात वस्तरा बाळगला, म्हणून माझी त्याचे विरुध्द फिर्याद आहे व त्याबाबत कायदेशीर कारवाई व्हावी ही विनंती आहे.

माझा जबाब मी वाचला तो सत्य आहे.

समक्ष

(...............................................)
स्वाक्षरी

(.......................................)
पोलीस उपनिरिक्षक,
........................ पोलीस ठाणे,
मुंबई.

## दारुच्या भट्टीवर धाड ( प्रथम खबरी अहवाल )

श्री. ---------------------------------------- हिंदु / -------------- वर्षे, व्यवसाय :- नोकरी
पत्ता ------------------------------------------------------------------------------ यांचा जबाब

मी पोलीस शिपाई या पदावर बृहन्मुंबई पोलीस दलात गेल्या ------------- वर्षापासून नोकरी करीत आहे. माझा पट्टा क्रमांक ------------------ असा आहे. दिनांक ------------ पासून मी ------------- पोलीस ठाण्यास नेमणूकीस आहे व सध्या मी ------------------------- स्टाफमध्ये नोकरी करीत आहे.

आज दिनांक ------------- रोजी --------- वाजता आम्हाला खात्रीलायक खबर मिळाली की, ------- ठिकाणी -------------------- हा दारुची हातभट्टी चालवित आहे. अशी खबर मिळाल्या वरुन पो.उ.नि. -------, पो.शि. ------------- पो.ह. --------------, पो.शि. ----------- यांनी दोन पंचांना पाचरण केले इत्यादी व छापा मारण्याकरिता निघालो. जाण्यापूर्वी आम्ही साहित्य सिल करण्याचे साहित्य सोबत घेतले व योग्य नोंद ठाणे दैनंदिनी मध्ये केली.

सुमारे ------------- वाजता आम्ही --------------- या ठिकाणी खाडी जवळ पोहोचलो त्यावेळी आम्हाला दूर अंतरावर भट्टी सुरू असल्यामुळे धूर येताना दिसला तेव्हा आमची बातमी खरी असल्याबाबत खात्री झाली आणि नंतर झाडीतून मार्ग काढीत भट्टीच्या दिशेने गेलो आणि झाडाच्या मागे राहून परिस्थिती पाहिली त्यावेळी आम्हाला खालील प्रमाणे स्थिती आढळली.

१) हा इसम (आरोपी ------------------ याचे कडे बोट दाखवून) भट्टी वर ठेवलेले मिश्रण ढवळत होता.
२) हा इसम (आरोपी ------------------ याचे कडे बोट दाखवून) भट्टीत सरपण घालत होता.
३) हा इसम (आरोपी ------------------ याचे कडे बोट दाखवून) गॅलन मध्ये पाणी भरीत होता.
४) हा इसम (आरोपी ------------------ याचे कडे बोट दाखवून) तयार दारु टोपातुन कॅन मध्ये भरत होता.
५) हा इसम (आरोपी ------------------ याचे कडे बोट दाखवून) जमिनीत पुरलेल्या ड्रम मधून वॉश काढून घेत होता.

आम्हाला मिळालेल्या बातमीची खात्री झाल्यानंतर आम्ही धावत त्या ठिकाणी गेलो आणि तेथे असलेल्या इसमांना आहेत त्याच स्थितीत उभे राहण्यास सांगितले. पो.उ.नो. ----------------- यांनी आपण पोलीस असल्याचे आणि धाड घालण्याचे उद्दिष्ट सांगितले व पंचांचे समक्ष दिसत्या परिस्थितीचा पुढे चालु ठेवला त्या मध्ये खालील प्रमाणे स्थिती दिसली.

दगडाचे तात्पुरते बांधकाम करुन त्याची भट्टी तयार करण्यात आली होती. त्यात अर्धवट जळालेले लाकडाचे तुकडे होते, भट्टीवर एक मोठा पत्र्याचा ड्रम होता व त्यामध्ये तयार मिश्रण होते या भांड्याला जोडूनच उर्ध्वपतनाचे भांडे व नरसाळे व चाटू होता व ते दुसऱ्या भांड्यास जोडले होते व त्यातुन येणारी वाफ ही पातेल्यात जमा करण्यात येत होती. सदर ठिकाणी ६ काळे प्लास्टीकचे कॅन ज्यामध्ये पाणी होते. जवळच एका प्लास्टीकच्या पिशवीमध्ये सुमारे १ कीलो नवसागर व १० जुने बॅटरीचे सेल ठेवलेले होते. आम्ही आसपासचे जमिनीची पाहणी केली आणि काठी ठोकुन पाहिले तेव्हा जमिनीत ड्रम पुरले असल्याचे जाणीव झाली म्हणुन पंचांचे समक्ष माती उकरली असता त्यामध्ये ६ ड्रम जमिनीत पुरुन ठेवल्याचे आम्हाला आढळले ते पंचांचे समक्ष बाहेर काढण्यात आले त्यामध्ये रसायन कुजण्याकरिता ठेवण्यात आले होते.

त्यानंतर आम्ही तयार दारुपैकी सुमारे १८० एम.एल. दारु ही दोन स्वच्छ काचेच्या बाटल्यामध्ये विश्लेषणाकरीता घेतली ड्रम मधले रसायन व वर नमुद केलेली मालमत्ता ताब्यात घेतली. नमुना दारु चे बाटलीवर पंचांचे व पो.उ.नि............. यांच्या स्वाक्षरीचे लेबल लावण्यात आले.

अधिक चौकशी अटक आरोपीचे कडे करता सदरची भट्टी ही ------------------ याची असल्याचे त्यांनी सांगितले. यातील आरोपी व पाहिजे असलेला आरोपी ----------- यांनी ----------- या ठिकाणी अनधिकृतपणे दारुची भट्टी लावल्याबाबत आणि दारु उत्पादित केल्याबाबत माझी फिर्याद आहे त्याबाबत योग्य कार्यवाही व्हावी ही विनंती आहे.

माझा जबाब मी वाचला तो सत्य आहे.

समक्ष

(फिर्यादीची स्वाक्षरी)

पोलीस उप निरीक्षक,
---------- पोलीस ठाणे, मुंबई.

## आरोपीला शिक्षा होण्याकरीता लक्षात ठेवावयाचे मुद्दे

- प्रथम खबर मध्ये खबर देणाऱ्या व्यक्तीचे पुर्ण नाव, वय, व्यवसाय त्याचा पुर्ण पत्ता, दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई-मेल वगैरे न चुकता नमूद करणे गरजेचे आहे. आवश्यकता असेल तेथे प्रथम खबर देणारा व आरोपीच्या जातीचा / पोटजातीचा उल्लेख करावा, त्याकरीता जातीचे मुळ प्रमाणपत्र / वैधता प्रमाणपत्र घ्यावे. झेरॉक्स प्रत किंवा ॲफिडेव्हिट घेऊ नये ते पुराव्याच्या दृष्टीने महत्वाचे नाही. शाळा सोडल्याचा दाखला फक्त उपयोगी नाही.
- प्रथम खबर उशिरा असल्यास उशिराचे कारणे स्पष्ट नमूद करावे. [(Dispatching of F.I.R. to the Magistrate after 3 days without any explanation for delay will support the defense contention that F.I.R. was after thought. (Ajodhaya Singh v/s State of Bihar 1990 BLJR 378)]

## प्रथम खबरी मधील त्रुटीमुळे आरोपी निर्दोष सुटण्याची सर्वसाधारण कारणे

- गुन्हा दाखल करण्यामध्ये १५ दिवसांच्या झालेल्या विलंबाचे कारण प्रथम खबरीमध्ये स्पष्ट केले नाही.
- गुन्हा दाखल झाल्यानंतर प्रथम खबरी अहवालाची प्रत विनाविलंब संबंधीत न्यायालयाकडे पाठविली नाही.
- खबर देणारे न्यायालयात फितूर होतात, म्हणून त्यांना विश्वासात घेऊन ते फितूर होणार नाही याची खबरदारी घ्यावी. या कारणास्तव आरोपी निर्दोष सुटतात.

# प्रथम खबर लिहून घेतांना विचारात घ्यावयाचे मुद्दे

- पहिली खबर एम.आय.आर. या खास बुकातील अनुक्रम असलेल्या कागदावरच लिहिलेली पाहिजे.
- पहिली खबर देणाऱ्याचे संपूर्ण नांव. धर्म, वय, व्यवसाय व संपूर्ण पत्ता यांचा उल्लेख असावा
- ह्या खास फॉर्मच्या दर्शनी भागात विविध रकाने असतात. मागील भागावर फिर्यादीच्या शब्दात आत्मनिवेदनात्मक गुन्ह्याची खबर लिहून घ्यावी
- हे आत्मनिवेदन मुद्देसूद, तपशीलवार आणि गुन्हेगार माहित असेल, तर शक्यतो तत्संबंधी पूर्ण माहिती असावी

- गुन्ह्याची तारीख, वेळ, स्थळ, गुन्हा प्रकार, कोणाविरुद्ध अपराध, कोणी केला, जे शक्य असेल, त्याचा तपशील अंतर्भूत असावा.
- गुन्ह्यात कोणते हत्यार वापरले गेले, गुन्हेगाराचे व संबंधित इसमाचे नाते काय, हा तपशील मिळत असल्यास अंतर्भूत करावा.
- गुन्ह्यात 'मालमत्ता' संबंध असल्यास संपूर्ण तपशील, प्रकार, वजन, किंमत पावत्या यांसह घ्यावा.
- खबर देण्यास विलंब असेल तर त्याचे स्पष्टीकरण आवश्यक आहे, आरोपीचा तपशिल माहित असल्यास संपूर्ण नाव-पत्त्यासह घ्यावा, निदान वर्णनाचा तरी अंतर्भाव शक्य असल्यास व्हावा.
- पहिली खबर देणाऱ्याची सही अथवा अंगठा आवश्यक.

# प्रश्न व सुचना



# धन्यवाद ....